# तंत्रशिक्षणसंचालनालय, महाराष्ट्रराज्य

३, महानगरपालिकामार्ग, पत्रपेटीक्रमांक1967,मुबई4000 001.

दुरध्वनी– 22620601/22690602/22641150/22641151फॅक्स् – 2269 2102.

E-MAIL :desk3 @dtemaharashtra.gov.in Internet : http://www.dtemaharashtra.gov.in


तात्काळ -इमेल द्वारे

क्र.०३/तंशिसं/आयटीसेल/एआयएसएचई/२०२१-२२/ ६८ दिनांक :-०८-१२-२०२१

प्रती,
सहसंचालक,
विभागीय कार्यालय,
मुंबई,पुणे,नाशिक,अमरावती,औरंगाबाद,नागपूर

विषय – AISHE-2020-21 कार्यक्रमांतर्गत माहिती अपलोड करण्याबाबत.

संदर्भ –क्र.उशिसं/सांख्यिकी/एआयएसएचई/२०२१-२२/१३७८९दि.२६ नोव्हेंबर २०२१

आपल्या विभागीय कार्यालयाअंतर्गत येणा-या ज्या नवीन /जुन्या पदविका संस्थांनी अखिल भारतीय उच्च शिक्षण सर्वेक्षण कार्यक्रमाच्या वेबपोर्टलवर नोंदणी (रजिस्टेशन) केलेली नाही अशा सर्व पदविका संस्थांनी सन २०२०-२१ करिता अखिल भारतीय उच्च शिक्षण सर्वेक्षण कार्यक्रम (AISHE) यावेबपोर्टलवर त्वरीत रजिस्टेशन करून घेणे आवश्यक आहे. सन २०२०-२१ करीता रजिस्टेशन / नोंदणीकरिता AISHE वेबपोटलवर दि. ०१-१२-२०२१ पासून सुरु झाले आहे. तरी सर्व संस्थांनी नोंदणी व डीसीएफ-3 दिनांक १४ फेब्रुवारी २०२२ पर्यंत अपलोड करावयाचे आहे.

संबंधीत संस्थांनी www.aishe.gov.inया संकेतस्थळावर नोंदणी करण्या संबंधी कार्यवाही पूर्ण करावी. ज्या संस्थांना याबाबत अडचणी येतील त्यांनी सांख्यिकी शाखा,उच्च् शिक्षण संचालनालय, महाराष्टराज्य,पुणे - 411001 दूरध्वनीक्र. (020) 65001173/65001016 येथे प्रत्यक्ष भेट देवून किवा दूरध्वनीवर संपर्क साधून अडचणीचे निराकरण करून घ्यावे.

**AISHE** ची माहितीwww.aishe.gov.inया संकेत स्थळावर नोंदणी न केल्यामुळे संस्था किंवा विद्यार्थी यांना शासकीय योजने पासून वंचित रहावे लागल्यास त्यासाठी सर्वस्वी संस्थेस जबाबदार धरण्यात येईल यांची सर्व संस्थांना माहिती करून देण्यात यावी.

आपल्या विभागीय कार्यालया अंतर्गत येणा-या सर्व पदविका संस्थांना याचेबाबत तत्परतेने कार्यवाही करण्याच्या सुचना देण्यात याव्यात.

(प्रमोद नाईक)
सहसंचालक
तंत्रशिक्षण संचालनालय,महाराष्ट्रराज्य,मुंबई